# ‘विवेकानंद’मध्ये जल साक्षरता सप्ताह

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मानवी महत्त्वाकांक्षा व आधुनिक जीवशैलीमुळे पाण्याचा अपव्यय आणि प्रदूषण होत आहे. भावी पिढीसाठी निसर्गाचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी पाण्याचे महत्त्व जाणून घेतले पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. एस. एस. पन्हाळकर यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेज आयक्यूएसी विभाग, भूगोल विभाग, एनएसएस व केमिस्ट्री विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जल साक्षरता सप्ताहाच्या समारोप प्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते.

प्रास्ताविक डॉ. गोवर्धन उबाळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ऐश्वर्या हिंगमिरे यांनी केले. डॉ. शुभांगी काळे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. श्रुती जोशी, प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. संदीप पाटील, प्रा. पी. आर. बागडे, प्रा. डॉ. एस. डी. शिर्के, प्रा. डॉ. अस्मिता तपासे आदी उपस्थित होते.